# अल्पपरिचय

# अल्पपरिचय

नाव-श्रीमारूती भुजंगराव चितमपल्ली

जन्म – १२ नोव्हेंबर, १९३२.

जन्मस्थळ – सोलापूर

शिक्षण – टी. एम. पोरे प्राथमिक विभाग सोलापूर
नॉर्थकोट टेक्निकल हायस्कूल (माध्यमिक), सोलापूर
१९५३ साली एम. एस. सी., (अकरावी) उतीर्ण
इंटरमीजिएट सायन्स – दयानंद महाविद्यालय, सोलापूर.

व्यवसायिक शिक्षण –

कोइमतूर फॉरेस्ट कॉलेज, कोइमतूर. तसेच बंगलोर, दिल्ली, कान्हा राष्ट्रीय उद्यान (मध्यप्रदेश) डेहराडून येथील वने आणि वन्यजीवविषयक संस्थांमधून.

सदस्य व पदे –

- संस्थापक सचिव – डॉ. सालीम अली वन्यप्राणी संरक्षण संस्था, नवेगावबांध, जि. भंडारा (महाराष्ट्र)
- संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
- सल्लागार समिती सदस्य, राज्य वन्यजीवन संरक्षण.
- सदस्य, मराठी अभ्यासक्रम समिती (औरंगाबाद)
- सन्माननीय सदस्य, विदर्भ साहित्य संघ (१९९८)

ग्रंथसंपदा –

१. पक्षी जाय दिगंतरा, (१९८३), साहित्यप्रसार केंद्र, सीताबर्डी, नागपूर.

२. जंगलाचं देणं, (१९८५), साहित्य प्रसार केंद्र, सीताबर्डी, नागपूर.

३. रानवाटा, (१९९१) साहित्य प्रसार केंद्र, सीताबर्डी, नागपूर.

४. शब्दाचं धन, (१९९३), साहित्यप्रसार केंद्र, सीताबर्डी, नागपूर.

५. रातवा, (१९९३), उत्कर्ष प्रकाशन, डेक्कन जिमखाना, पुणे.

६. मृगपक्षिशास्त्र, (अनुवाद), (१९९३), महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.

७. घरट्यापलिकडे, (१९९५), साहित्यप्रसार केंद्र, सीताबर्डी, नागपूर.

८. पाखरमाया, (२०००), उत्कर्ष प्रकाशन, डेक्कन जिमखाना, पुणे.

९. निसर्गवाचन उत्कर्ष प्रकाशन, डेक्कन जिमखाना, पुणे, (२०००)

पद्मगंधा प्रकाशन, एरंडवन, पुणे.

१०. सुवर्णगरूड, (२०००), नवचैतन्य प्रकाशन, बोरीवली (प.) मुंबई.

११. आपल्या भारतातील साप, (इंग्रजी–मराठी अनुवाद) (२०००)

नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली.

१२. पक्षिकोश, (२००२), साहित्यप्रसार केंद्र, सीताबर्डी, नागपूर.

१३. आनंददायी बगळे, (संस्कृत साहित्यातील काही पक्षी) (२००२)

अनुभव प्रकाशन, विलेपार्ले (पू.) मुंबई.

१४. निळावंती, (२००२), अनुभव प्रकाशन, विलेपार्ले (पू.) मुंबई.

१५. चैत्रपालवी, (२००४), साहित्यप्रसार केंद्र, सीताबर्डी, नागपूर.

१६. चकवाचांदण : एक वनोपनिषद, (आत्मचरित्र) (२००५)

मौजे प्रकाशन गृह, मुंबई.

१७. केशराचा पाऊस, साहित्यप्रसार केंद्र, सीताबर्डी, नागपूर.

१८. चित्रकंठ, (इंग्रजी–मराठी अनुवाद), नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली

आगामी–

१९. नवेगावबंध, साहित्यप्रसार केंद्र, सीताबर्डी, नागपूर.

२०. श्यौनिकशास्त्र, साहित्यप्रसार केंद्र, सीताबर्डी, नागपूर.

ध्वनिफिती –

'नागझिऱ्याच्या जंगलात' आणि 'रानपाखरं' अनुभवकथनावर आधारित.

श्री. मारुती चितमपल्ली

यांची मुलाखत

छायाचित्र व स्वाक्षरी संदेश

# मुलाखत

## " मा. श्री: मारूती चितमपल्ली यांची मुलाखत "

### मुलाखत घेणारे :– शुभांगी मधुकर देवकुळे.
### नागपूर, दिनांक : ११/१२/२००६

चितमपल्ली सर, नमस्ते.

आपण ७९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झालात त्याबद्दल अभिनंदन.

चितमपल्ली – धन्यवाद ! आभारी आहे.

प्रश्न – चितमपल्ली सर, 'जंगल' हा विषय तुम्ही मराठी साहित्यात आणल्याने निसर्ग विषयक लेखनाची वेगळी वाट निर्माण झाली तेव्हा तुमच्या या लेखन कार्यात तुम्हाला मार्गदर्शन आणि प्रोत्साहन कसे मिळत गेले, हे आपण मला सांगाल का?

उत्तर – प्रा. नरहर कुरूंदकर हेच माझे मार्गदर्शक ठरले, त्यांनी मला मार्गदर्शन तर केलेच पण वेळोवेळी प्रोत्साहन दिल्याने मी हे सगळं लेखन करू शकलो. लेखन कसे करावे हे त्यांनीच मला सांगितले.

प्रश्न – चितमपल्ली सर, आपली मातृभाषा तेलगू असूनही आपण मराठीत इतके उत्कृष्ट लेखन केले. हे सगळं कसे शक्य झाले? मराठी भाषेबद्दल तुम्हाला काय वाटतं?

उत्तर – माझी मातृभाषा जरी तेलगू असली तरी माझे शिक्षण मराठीतून झाले. मराठी प्रदेशात मी वाढलो, मोठा झालो. मराठी लोकांचा सहवास, मराठी पुस्तकांचे वाचन यामुळे मला मराठी भाषेची गोडी लागली व त्यातून मी लेखनाकडे वळलो.

प्रश्न – चितमपल्ली सर, आपण लेखनाला कशी सुरुवात केली?

उत्तर – १९६७ पासून सकाळ, केसरी, महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रातून मी प्रथम लेख लिहायचो. नंतर १९८३ ला माझे 'पक्षी जाय दिगंतरा' हे पुस्तक नागपुरात प्रथम प्रसिद्ध झाले.

प्रश्न – चितमपल्ली सर, तुमचे साहित्य लेखन इतके सुंदर आहे की, निसर्ग या विषयावर एखादे काव्य तुम्ही अगदी सहज लिहू शकला असता, शिवाय सुरुवातीला शास्त्रीय लेखनाकडे कल असूनही तुम्ही पुढे ललितरम्य शैलीत लेखन केले आहे. त्यामागे आपली कोणती भूमिका आहे?

उत्तर – अनुभवाच्या प्रकटीकरणासाठी 'ललित गद्य' हा एक अतिशय चांगला साहित्य प्रकार आहे. ललित गद्यामध्ये आपल्याला आलेले अनुभव लगेच जसेच्या तसे लिहिता येतात. यामुळे जंगलामध्ये मला जे अनुभव आले ते लगेच लिहिता आले. बहिणाबाईना जशी कविता सुचली तसे हे सारे लेखन मला सुचत गेले.

प्रश्न – चितमपल्ली सर, आपण अनेक भाषा कशा आत्मसात केल्या? आपल्याला विविध भाषा शिकण्याची आवड कशी निर्माण झाली? भाषा शिकताना तुम्हाला काही अडचणी आल्या का?

उत्तर – 'पक्षीकोशा' करिता मला अनेक भाषांचा अभ्यास करावा लागला. कोणतीही भाषा शिकताना प्रथम अवघडच वाटते. पण जर आपल्याला शिकण्याची आवड असेल आणि मनामध्ये जिद्द असेल तर त्या भाषा आत्मसात करता येतात त्यासाठी भाषा शिकण्याची आवड पाहिजे मग त्यामध्ये येणाऱ्या अडचणी आपोआपच दूर होत जातात. तसे पाहिले तर मला इंग्रजी, जर्मन, रशियन, संस्कृत, प्राकृत, अर्धमागधी इ. या प्राचीन भाषा आणि गुजराती, बंगाली याशिवाय आदिवासीच्या बोली भाषा कोरकू, गौंड, वारली, कोळी इ. अशा अठरा प्रकारच्या भाषा येतात.

प्रश्न – चितमपल्ली सर, आपल्याला निसर्गाचं, जंगलाचं आकर्षण अगदी सुरवातीपासूनच होतं का? वनखात्यात काम करताना निसर्गाविषयी प्रेम जाणवू लागलं?

उत्तर – उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये 'नाइ–चाकूर' हे माझं आजोळ आहे. (नाइ म्हणजे कुत्रा) माझ्या आईला रानाची माहिती असल्याने आणि लहानपणी मी मामांबरोबर रानात फिरत राहायचो त्याच्यामुळे बालपणापासूनच मला निसर्ग निरीक्षणाची आवड निर्माण होत गेली.

प्रश्न – निसर्गाच्या हिरव्या वाटेवरून चालताना आपल्याला पक्षी प्राणी यांच्याबद्दल इतका जिव्हाळा कसा निर्माण झाला? जंगलातील प्राणी, पक्ष्यांकडून आणि त्यांच्या निरीक्षणामधून तुम्हाला वेगळं काही शिकायला मिळालं का?

उत्तर – मानव, प्राणी, पक्षी हे सगळं निसर्गाचंच आहे. त्यामुळे निसर्ग निरीक्षण करताना प्राणी, पक्षी, कीटक वगैरे या सर्वांविषयी जिव्हाळा आपोआपच निर्माण होत गेला.

त्यानंतर मानव आणि पक्षी, प्राणी यांच्यामध्ये फरक असा आहे की, मनुष्य दुसऱ्यावर अतिक्रमण करतो तसे प्राणी, पक्षी अतिक्रमण करत नाहीत. खून वगैरे असलं काही त्यांच्यामध्ये नसते. माणूस मात्र सात जन्माचा संग्रह करून दुःखाला कारणीभूत होतो तसं प्राणी पक्षी फक्त पोटापुरतं अन्न शोधतात. उद्याची काळजी ते करत नाहीत.

मानवाला जशा भावभावना असतात. तशा प्राणी–पक्ष्यांना इतर जीवांनाही भावभावना असतात. मानवाप्रमाणे इतर जीवही स्वतःच्या शरीराची स्वच्छता ठेवतात. उदाहरणार्थ जिथे पाण्याचा साठा आहे तिथे जाऊन पक्षी आपली पिसे पायाच्या बोटांनी स्वच्छ करतात.

प्रश्न – चितमपल्ली सर, आपण लिहिलेलं 'जंगलाचं देणं' हे पुस्तक अतिशय वाचनीय आहे. लेखनशैली खूप आकर्षक आहे ती वाचकाच्या मनाला सहज भावते. परंतु हे पुस्तक लिहिण्यामागे आपली भूमिका काय आहे?

उत्तर – 'जंगल' या विषयाकडे बरेच जण दुर्लक्ष करतात, तेव्हा जंगलाचं महत्व सर्वांना समजावं, या दृष्टीने मी जंगल निरीक्षण केलं, आणि ते वाचकांना सांगावसं वाटले

म्हणून छापले. शेवटी ते तुमच्यापर्यंत पोहचवावं एवढाच माझा हेतू आहे.

प्रश्न – चितमपल्ली सर, आपण 'जंगलाचं देण' या पुस्तकामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे, तुमची मुलगी छाया पऱ्यांबरोबर खेळायची. हे वाचून याच्याविषयी कुतूहल वाटते. तेव्हा तुमच्या मुलीला ख़रंच कधी पऱ्या पहायला मिळाल्यात का?

उत्तर – माझ्या मते, पऱ्यांचं जग हे खरोखर असतंच.

छाया – सतत पऱ्यांच्या कथा वाचल्यामुळे मला त्याच प्रतिमा समोर दिसत होत्या. प्रत्यक्ष पऱ्या मी पाहिल्या नाहीत परंतु पऱ्यांच्या धुसर अशा अस्पष्ट आकृत्या मला दिसायच्या.

प्रश्न – चितमपल्ली सर, 'जंगलाचं देणं' या पुस्तकात 'भुत्याच्या लोटणा' विषयी कथा आलेल्या आहेत. तेव्हा 'भूत असणं' ही आजच्या विज्ञान युगात न पटणारीच बाब आहे नाही का? शिवाय यावरुन जंगलात भूत असतं असाही गैरसमज होऊ शकतो. मग हा समज का गैरसमज? खरच जंगलात भूत असतं का? तुम्हाला याबद्दल का वाटतं?

उत्तर – जंगलातील 'भुत्याचे लोटण' हे आदिवासींनी दिलेले नाव आहे. आणि त्यांचा हा समज आहे. परंतु मला वाटतं, काही गोष्टी अशा असतात की ज्या दाखवता येता नाहीत फक्त अनुभवता येतात आणि आदिवासींना तर तिथे असे अनुभव वरचेवर आलेले आहेत. कधी कधी काही गोष्टींचा स्वतःला अनुभव येतो पण पुरावा देता येत नाही.

प्रश्न – 'टेकराज' या लेखातील तुमच्या मामानं तुम्हाला सांगितलेली 'रातवा' या पाखराची कथा तुम्हाला कितपत योग्य वाटते?

उत्तर – ही लोककथा आहे. लोककथा असल्याने मला ती योग्य वाटते परंतु ज्याला योग्य वाटेल त्याने ती घ्या नाहीतर सोडून द्या.

प्रश्न – चितमपल्ली सर, आज पर्यावरणाची समस्या ही वाढतच चालली आहे, त्यामुळे भूकंप, सुनामी वादळे, ग्लोबल वॉर्मिंगचा तडाखा जाणवू लागला आहे, तेव्हा याबद्दल आपल्याला काय वाटते?


उत्तर – 'पर्यावरण' हा एक मोठा चिंतेचा प्रश्न आहे. या प्रश्नाची सोडवणूक करणे हे प्रत्येक मानवाचे कर्तव्य आहे. समाजातील वाढती लोकसंख्या कमी झाल्याशिवाय पर्यावरणाचा समतोल राखला जाणार नाही. वृक्षतोड थांबविण्यासाठी शासनाने कसोशीने प्रयत्न केले पाहिजेत, शिवाय समाजातील प्रत्येकाने पर्यावरणाचा समतोल राखून आपल्या स्वतःचे संरक्षण केले पाहिजे

प्रश्न – आपल्या साहित्यात अविस्मरणीय ठरावी अशी आदिवासींची व्यक्तिचित्रे येतात, तुम्ही रात्र–रात्र त्यांच्याबरोबर चर्चा केलेली आहे मग या आदिवासींच्या जीवनाबद्दल आपल्याला काय वाटते?

उत्तर – लोकांना असे वाटते की, आदिवासींची स्थिती अत्यंत दयनीय असणार परंतु प्रत्यक्षात तसं काही नाही. त्यांची गावं जंगलात विखुरलेली असतात. जे काही जंगलात आहे ते खाऊन आदिवासी माणसं जगतात. जंगलातच ते पिकांचे वगैरे उत्पन्न काढतात. त्यामुळे अन्न पाणी मुबलक आहे. टेप, टी. व्ही., रेडिओ अशा सुखसोयी त्यांच्याकडे नाहीत तरीही आदिवासी मिळेल ते खाऊन खूप सुखी आहेत. उद्याची काळजी त्यांना नाही. आदिवासी मुलांना शिक्षणाची सोय झाली परंतु आदिवासी भागात जाऊन शिक्षकांनी ज्ञान दानाचे कार्य केले पाहिजे. आदिवासी भागात जाण्यास शिक्षक कचरतात. त्यांचे प्रबोधन केले पाहिजे.

धन्यवाद ! चितमपल्ली सर,

आपला अमूल्य वेळ देऊन आपण माझ्याशी आपल्या लेखनाबद्दल अनुभवाबद्दल बोललात, आपले विचार सांगितलेत त्याबद्दल धन्यवाद ! मी आपली अत्यंत आभारी आहे.



"जंगलाचं देणं" या माझ्या पुस्तकाचा काळजीपूर्वक अभ्यास करून
आपण त्यावर एम्.फिल करताय, हे कळल्यामुळे आनंद झाला.
तुमच्या या संशोधनपर लेखनामुळे मराठी वाचकांना जंगल,
वन्य प्राणी, पक्षी, कीटक, वृक्ष आणि वेली यांचा परिचय
होईल. त्यादृष्टीने हे संशोधन अतिशय महत्वाचे आहे. हे
हाती घेतलेले काम सफल होवो
आपणास माझ्या हार्दिक शुभेच्छा!